# कंत्राटी पदभरती जाहिरात

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## पुणे परिमंडळ, पुणे, महाराष्ट्र

राष्ट्रीय आरोग्य अंतर्गत खालील कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय WALK IN INTERVIEW द्वारे भरावयाची आहेत.

जाहिरात दिनांक - २४/०५/२०२३

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्तपदे | नियुक्तीचे ठिकाण कार्यक्रम नाव | वयोमर्यादा | शैक्षणिकअर्हता | संवर्ग | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय अधिकारी MBBS | ०१ | आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र औंध पुणे | खुला ३८ व राखीव ४३ (NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल) (निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्षे पर्यंत) | MBBS from Recognized University MCI/MMC कौन्सिल कडील नोंदणी आनिवार्य | खुला - ०१ | रु.६०,००० /- प्रतिमाह |
| 2 | | ०१ | राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे | | | खुला - ०१ | रु.६०,००० /- प्रतिमाह |

अटी व शर्ती :-

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती ११ महिने २९ दिवस असेल.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पद आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) सेवानिवृत्त विशेषतज्ञ/अधिकारी यांची निवड झालेस सदर पदाकरीता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहीत मार्गदर्शक सुचनांनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व नियुक्ती ठिकाणात बदलहोऊ शकतो तसेच नियुक्तीच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो, याबाबतचे सर्व अधिकार मा. उपसंचालक, पुणे मंडळ, पुणे यांनी राखुन ठेवले आहेत. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.

७) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व नियुक्ती ठिकाणात बदलहोऊ शकतो तसेच नियुक्तीच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो, याबाबतचे सर्व अधिकार मा. उपसंचालक, पुणे मंडळ, पुणे यांनी राखुन ठेवले आहेत. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत अथवा नियुक्ती ठिकाणामध्ये बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.

८) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

९) एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावायाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

१०) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

११) निवड प्रक्रियासंदर्भातील माहिती www.arogya.maharashtra.gov.in / www.nrhm.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

१२) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१३) विशेषज्ञ, अति विशेषज्ञ व एमबीबीएस वैदयकिय अधिकारी या पदांकरीता शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ/अधिकारी या पदांकरीता अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजु झालेला दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्ती झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवानिवृत्तीनंतर देय असलेले वेतन (पेन्शन) याबाबतची संपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी.

१४) खाजगी संस्थाचा अनुभव ग्राहय धरणेत येईल परंतु खाजगी संस्थाच्या अनुभव प्रमाणपत्रासोबत संबंधित उमेदवारांनी अनुभव प्रमाणपत्रामध्ये नमुद केलेल्या कालावधीसाठी संबंधीत संस्थांनी अदा केलेल्या मानधनाची पावती व बँक स्टेटमेंट जोडणे आवश्यक आहे.

१५) अनुभव प्रमाणपत्र सादर करताना संस्थेचे लेटर हेड, जावक क्रं व अनुभव कालावधीचा स्वयंस्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे, नसल्यास अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येणार नाही. नियुक्तीच्या आदेशाच्या आधारे गुण दिले जाणार नाहीत.

१६) विशेषज्ञ, अति विशेषज्ञ व एमबीबीएस वैदयकिय अधिकारी पदासाठी सेवा निवृत्त अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे तसेच शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, त्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१७) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१८) उपरोक्त पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील, अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविणेत येईल.

१९) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. उपसंचालक, पुणे मंडळ, पुणे व निवड समिती यांचेस्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत, याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

२०) <u>दि.३०/०५/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. Walk In Interview</u> घेणेत येतील. उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतींसह नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, विधान भवन समोर, पुणे ४११००१ येथे समक्ष <u>दि.३०/०५/२०२३</u> रोजी सकाळी १०.०० वाजता राष्ट्रीय आरोग्य अभियान, पुणे मंडळ कार्यालय पुणे येथे वेळेत उपस्थित रहावे. तसेच <u>Walk In Interview</u> साठी येताना उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कोणताही भत्ता देय राहणार नाही.

२१) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियमानुसार नियुक्ती आदेश दिले जातील. सदर निवड यादी ही तयार झालेनंतर वेबसाइटवर प्रसिध्द झालेनंतर पुढील एक वर्षापर्यंत वैध राहील. तसेच वेळोवेळी रिक्त होणाऱ्या ठिकाणी नियुक्ती आदेश दिले जातील.

२२) अर्ज सादर करताना खालील भरती प्रक्रिया शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.

२३) अर्जासोबत उमेदवारांनी परिक्षा शुल्क रक्कम रु.३००/- रुपयांचा डिमांड ड्राफट **Deputy Director Health Services Pune** यांच्या नावे काढावयाचे आहे. अर्जासोबत डिडी जोडायचा आहे.

२४) उमेदवारांना वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सर्व सुचना, अंतिम पात्र यादी <u>www.arogya.maharashtra.gov.in</u> / <u>www.nrhm.maharashtra.gov.in</u> या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील.

२५) रिक्त पदासाठी आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध नसलेस इतर संवर्गातील उमेदवारांस नियमानुसार नियुक्ती दिली जाईल.

२६) सदर पदाकरिता उमेदवार उपलब्ध न झालेस दर महिन्याच्या चौथ्या मंगळवार मा. उपसंचालक, पुणे मंडळ, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्तीसाठी निवड प्रक्रिया राबविता येईल. परंतु ही अट केवळ पद रिक्त असल्यास लागु राहिल अन्यथा नाही.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विशेषज्ञ, अति विशेषज्ञ व एमबीबीएस वैदयकिय अधिकारी पदांच्या पदभरतीच्या अनुषंगाने राबविणेची प्रक्रिया

अतिविशेषतज्ञ, विशेषतज्ञ, वैद्यकिय अधिकारी (MBBS) हि पदे थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पध्दतीचा अवलंब करणेत येईल.

१) Subject knowledge (१०)
२) "Research academic Knowledge (१०)"
३) Leadership Quality (१०)
४) Administrative Abilities (१०)
५) Experience (१०)
   a) For govt.experience-२ marks for one year
   b) For private experience-१ marks for one year

( संबंधित उमेदवारांनी अनुभव प्रमाणपत्रामध्ये नमुद केलेल्या कालावधीसाठी संबंधीत संस्थांनी अदा केलेल्या मानधनाची पावती व बँक स्टेटमेंट जोडणे आवश्यक आहे.)

Total experience -१० marks Maximum

एकुण गुण -५०

१. यानुसार गुणांकन केल्यावर गुणानुक्रमांनुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची अंतिम निवड यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

२. नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना रुजू करुन घेण्यापूर्वी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी संबंधित संस्था प्रमुख यांची राहील.

३. भरतीप्रक्रिये संदर्भातील मार्गदर्शक सुचना वेळोवळी www.arogya.maharashtra.gov.in / www.nrhm.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील, कोणत्याही उमेदवाराने उपसंचालक कार्यालयास प्रत्यक्ष संपर्क साधु नये.

४. नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना रुजू करुन घेण्यापूर्वी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी संबंधित संस्था प्रमुख यांची राहील.

❖ खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जाच्या सोबत जोडाव्यात.Walk In Interview साठी येताना मुळ कागदपत्रे घेवून यावीत.

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
२) राखीव उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र
३) शाळा सोडल्याचा/जन्म तारखेचा दाखला
४) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे
५) पासपोर्ट आकाराचा फोटो
६) शासकीय/निमशासकीय/खाजगी अनुभव असलेस अनुभव दाखला
७) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र
८) नावात बदल असलेस गॅजेट (राजपत्र) जोडावे.

(स्वाक्षरीत/-)
उपसंचालक, आरोग्य सेवा,
पुणे परिमंडळ, पुणे

# अर्जाचा नमुना

## .................................................... या पदासाठी अर्ज

| पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजिकचा साक्षांकीत फोटो |
|---|

प्रति,

**मा. उपसंचालक,**

आरोग्यं सेवा, पुणे परिमंडळ, पुणे

१) **संपुर्ण नाव** **मराठी** **इंग्रजी (कॅपीटल लेटर)**

- आडनाव:- ......................................... .......................................
- स्वत:चे नाव ......................................... .......................................
- वडीलांचे/पतीचे नाव ......................................... .......................................
- आईचे नाव ......................................... .......................................

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता पिनकोडसहीत:-.........................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

३) **मोबाईल क्रं:-**.................................. मेल आयडी.......................................................

४) **जन्मतारीख:-**.................................. दि. /०५/२०२३ रोजीचे वय:-.........वर्षे.........दिवस

५) कोणत्या प्रवर्गातुन अर्ज केलेल्या आहे त्याप्रमाणे खालील चौकटीमध्ये फक्त एकावरच अशी (☐) खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.ब. | भ.ज.क. | भ.ज.ड. | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आर्थिक मागास प्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | EWS | Open |
| | | | | | | | | | |

६) **शैक्षणिक अर्हता:-**

| अ. क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | किती पैकी गुण उदा:-५००/३५० | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**७) अनुभवः- (केवळ शासकिय/निमशासकिय/ खाजगी)**

| **संस्थेचे नाव** | **संस्थेचा प्रकार (शासकिय/निमशासकिय / खाजगी)** | **कालावधी** | | **एकुण वर्षे** | |
|---|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | वर्षे | महिने |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

८) आपणांविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय? चौकटीमध्ये अशी खुण करावी

| होय | नाही |
|---|---|
| | |

होय असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

.................................................................................................................................

.................................................................................................................................

९) अर्जासोबत खालील (छायांकीत) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) ......................................................................

२) .....................................................................

३) .....................................................................

४) ......................................................................

५) ......................................................................

१०) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? **होय/नाही**

११) **अर्जदार सदयस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत आहे काय?होय/नाही**

**असल्यास मुळ कार्यालयाचे नाव व पदनाम** ..............................................................

..............................................................

**मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.**

**सही/-**

**नावः-**